जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १८२ | गुरुवार, २२ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



## महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुका आता बॅलेट पेपरवर होणार?

### नाना पटोलेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**पुणे, ता. २१ :** ईव्हीएम हॅक होतात का, निवडणूक प्रक्रियेत छेडछाड शक्य आहे का, हा प्रश्न प्रत्येक निवडणुकीत पुन्हा पुन्हा ऐरणीवर येतो. महाराष्ट्रातही या वादाने नुकतेच उग्र रूप धारण केले. धुळे-सोलापूर मार्गावर ईव्हीएम विरोधात आंदोलन करत जाळपोळ करण्यात आली, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये काही आंदोलकांनी थेट राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात घुसून ईव्हीएमवर बंदीची मागणी केली. एकूणच ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर संशयाची छाया गडद होत असतानाच शेजारील कर्नाटकने एक मोठा आणि निर्णायक पाऊल उचलले आहे.

कर्नाटक सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ईव्हीएमऐवजी पारंपरिक मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने सप्टेंबर २०२५ मध्येच हा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला होता. राजकीय पक्ष, निवडणूक यंत्रणा आणि विविध घटकांशी चर्चा केल्यानंतर अखेर ईव्हीएमला बाजूला ठेवून मतपत्रिकेचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. कर्नाटकचे राज्य निवडणूक आयुक्त जी. एस. संगरे यांनी स्वतः या निर्णयाची घोषणा केली आहे. त्यानुसार २५ मेनंतर बंगळुरू महानगरपालिकेच्या अखत्यारीतील पाच नगरपरिषदांच्या निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेतल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे बंगळुरू महापालिका ही लोकसंख्येच्या बाबतीत मुंबई महापालिकेपेक्षाही मोठी आहे. त्यामुळे या निर्णयाचे राजकीय आणि प्रशासकीय पडसाद देशभर उमटण्याची शक्यता आहे. ईव्हीएमबाबत सातत्याने व्यक्त होणारा अविश्वास, विरोधकांचे आरोप, आंदोलने आणि कायदेशीर आव्हाने या पार्श्वभूमीवर कर्नाटक सरकारने घेतलेला हा निर्णय लोकशाही प्रक्रियेतील विश्वास पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

# लोणी काळभोर, थेऊर, सोरतापवाडीसह उरुळी कांचन गटात बहुरंगी लढत होणार?

## नाराजांचा स्वतंत्र गट मैदानात, अपक्षही आजमावणार नशीब

**लोणी काळभोर, ता. २१:** लोणी काळभोर, थेऊर, सोरतापवाडी तसेच उरुळी कांचन जिल्हा परिषद गटांमध्ये येणाऱ्या निवडणुका यंदा चांगल्याच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. महायुती व महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांबरोबरच नाराजांचा स्वतंत्र गट आणि अपक्ष उमेदवार यामुळे बहुतांश ठिकाणी तिरंगी किंवा बहुरंगी लढत होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

पक्षांकडून उमेदवारी जाहीर होत असताना अनेक इच्छुकांना डावलण्यात आल्याची भावना स्थानिक पातळीवर दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर तिकीट न मिळालेल्या नाराज नेत्यांचा एक गट संघटितपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. हा गट संपूर्ण ताकतीनिशी प्रचार करणार असून, यामुळे प्रमुख पक्षांच्या मतांमध्ये फुट पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लोणी काळभोर व उरुळी कांचन गटात आधीच राजकीय वातावरण तापले असून, बंडखोरीचे संकेत स्पष्ट दिसत आहेत. तर थेऊर आणि सोरतापवाडी गटात अधिकृत उमेदवारांसमोर अपक्ष आणि नाराज उमेदवारांचे आव्हान निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, काही अपक्ष उमेदवारांनीही तयारीला वेग दिला असून, स्थानिक कामांचा दाखला, समाजघटकांचा पाठिंबा आणि वैयक्तिक संपर्काच्या जोरावर आपले नशीब आजमावण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. हे अपक्ष उमेदवार थेट विजय न मिळवता किंगमेकरची भूमिका बजावू शकतात, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

एकूणच या सर्व गटांमध्ये यावेळी सरळ एकतर्फी लढत होण्याची शक्यता कमी असून, नाराज गट आणि अपक्ष उमेदवार निवडणूक निकालावर मोठा प्रभाव टाकणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. आगामी काळात उमेदवारी माघारी, अंतर्गत समझोते आणि शेवटच्या टप्प्यातील हालचालींमुळे राजकीय समीकरणे आणखी बदलण्याची शक्यता आहे.




**उमेदवारी अर्जांमुळे राजकीय हालचालींना वेग**

विविध पक्षांकडून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी दोन ते तीन, तर काहींनी त्याहून अधिक उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आगामी काळात पक्षांतराचे राजकारण रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एका पक्षाकडून तिकीट न मिळाल्यास दुसऱ्या पक्षात प्रवेश करून निवडणूक लढवण्याची तयारी काही उमेदवारांनी ठेवली असल्याची चर्चा आहे. आणखी काही नवे चेहरे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या खालील यादीमध्ये पक्षाचे संभाव्य उमेदवार असून यामध्ये बदल होऊ शकतात.

**लोणी काळभोर जिल्हा परिषद गट (अनुसूचित जातीसाठी (महिला) राखीव)**

१) भाजप : पूनम बाबुराव गायकवाड, ज्ञानेश्वर नामुगडे, श्वेता काळभोर
२) राष्ट्रवादी : शीतल कांबळे, अमोल टेकाळे, रेश्मा काळभोर
३) इतर : अनिता सुर्यकांत गवळी, सुवर्णा काळभोर, प्रकाश नारायण भिसे, विजय दाभाडे, राहुल जोगदंड, नितीन लोखंडे, नंदिनी कोळपे

**थेऊर जिल्हा परिषद गट (सर्वसाधारण महिला**

१) भाजप : पुष्पलता प्रकाश सावंत, योगेश दत्तात्रय काकडे, पूनम अशोक गायकवाड,
२) राष्ट्रवादी : कोमल संदेश आव्हाळे, युवराज काकडे, सुष्मा संतोष मुरकुटे
३) इतर : सिद्धांत सचिन तुपे, पल्लवी युवराज काकडे, संग्राम मच्छिंद्र कोतवाल, दिपाली विकास कांचन.

**कोरेगाव मूळ-केसनंद गट (सर्वसाधारण महिला)**

१) भाजप : कविता विजय पायगुडे, सूरज चौधरी, कुशाल सातव
२) राष्ट्रवादी : सुरेखा रमेश हरगुडे, कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, प्रमोद हरगुडे
३) इतर : हर्षदा कुशाल सातव, सुरेखा शिवाजी भोरडे

**उरुळी कांचन जिल्हा परिषद गट (अनुसूचित जातीसाठी राखीव पुरुष)**

१) भाजप : जीवन शिंदे, सुदर्शन चौधरी, सारिका लोणारी
२) राष्ट्रवादी : जितेंद्र बडेकर, आण्णा महाडिक, कोमल कांबळे
३) इतर : पूजा सणस, शंकर बडेकर, काका कुंजीर, अश्विनी प्रवीण बडेकर, महादेव शंकर कांबळे.

## निवडणुकीत कोट्यवधींचा खर्च, पण पगार किती? नगरसेवकांचे मानधन नेमके कसे ठरते?

**पुणे, ता. २१ :** निवडणुकीच्या काळात कोट्यवधी रुपये खर्च, जाहिरातींचा पाऊस, सभामेळाव्यांची गर्दी आणि सोशल मीडियावर प्रचाराची धडाकेबाजी दिसते. त्यामुळे अनेकांच्या मनात प्रश्न उभा राहतो. एवढा खर्च करून निवडून येणाऱ्या नगरसेवकाला प्रत्यक्षात किती पगार मिळतो? तो ठरतो कसा? आणि या पदाची आर्थिक किंमत नेमकी काय?

नगरसेवक म्हणजे महापालिका किंवा नगरपालिकेतील निवडून आलेला लोकप्रतिनिधी. रस्ते, पाणी, स्वच्छता, ड्रेनेज, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत नागरी प्रश्नांसाठी नागरिक थेट नगरसेवकाकडे अपेक्षा ठेवतात. मात्र या पदासाठी कोणताही मोठा पगार नसतो, हे अनेकांना माहीत नसते.



महाराष्ट्रात नगरसेवकांचे मानधन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत राज्य सरकार ठरवते. वेळोवेळी शासन अधिसूचना काढून हे मानधन निश्चित करते. हे मानधन ठरवताना दोन प्रमुख निकष पाहिले जातात. शहराची लोकसंख्या आणि महापालिकेचे वार्षिक उत्पन्न. त्यानुसार महापालिकांना अ, ब, क आणि ड अशा श्रेणींमध्ये वर्गीकृत केले जाते.

मुंबई, पुणे, नागपूरसारखी अ श्रेणीतील शहरे देशातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या महापालिका मानल्या जातात. त्यामुळे येथे नगरसेवकांना दरमहा साधारण २५,००० ते ३०,००० रुपये मानधन मिळते. याशिवाय बैठकीला उपस्थित राहिल्याबद्दल वेगळा भत्ता मिळतो.

ब आणि क श्रेणीतील कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरांमध्ये नगरसेवकांचे मानधन साधारण १०,००० ते १५,००० रुपये असते. तर नगरपालिका किंवा नगरपंचायतींमध्ये हे मानधन केवळ २,००० ते ५,००० रुपयांपर्यंत मर्यादित असते.

मानधनासोबत बैठक भत्ता, प्रवास भत्ता, मोबाईल बिल यांसारख्या काही सुविधा मिळतात. महापौर, उपमहापौर किंवा स्थायी समिती अध्यक्षांसारख्या पदांवर असलेल्यांना अधिक मानधन आणि सोयीसुविधा मिळतात.

मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, नगरसेवक म्हणून जनसंपर्क, सामाजिक कार्यक्रम, प्रभागातील छोट्या-मोठ्या कामांसाठी होणारा खर्च हा मिळणाऱ्या मानधनापेक्षा कितीतरी जास्त असतो. त्यामुळे नगरसेवक हे पद पगारासाठी नसून लोकसेवा आणि राजकीय वाटचालीसाठीची पहिली पायरी मानली जाते.

## पुण्यात मनसे–वंचितपेक्षा 'नोटा'ला जास्त मते

**पुणे,ता. २१ :** पुणे महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने स्पष्ट वर्चस्व सिद्ध केलं असून, आकडेवारीतून शहराच्या राजकारणातील बदलती दिशा ठळकपणे समोर आली आहे. एकूण मतांच्या ४३.१२ टक्के वाट्यासह भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला, तर विरोधकांची मते मोठ्या प्रमाणात विभागली गेल्याचा थेट फायदा भाजपला झाला आहे.




या निवडणुकीतील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे नोटाला मिळालेली मते. तब्बल २.९६ टक्के मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला असून, ही टक्केवारी मनसे, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पक्ष, एमआयएम आणि अपक्ष उमेदवारांपेक्षाही जास्त आहे. यामुळे शहरातील मतदारांमध्ये असलेली नाराजी आणि पर्यायांचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो.

राष्ट्रवादी काँग्रेसला २३.९३ टक्के मते मिळाली असून ती दुसऱ्या क्रमांकावर आहे. काँग्रेसला ८.४८ टक्के मते मिळाली, तर शिवसेनेला एकही जागा जिंकता आली नसली तरी ७ टक्के मते मिळाल्याने ती चौथ्या क्रमांकाचा पक्ष ठरली आहे. शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) यांनाही अपेक्षेप्रमाणे यश मिळालं नाही.

भाजपने शहरातील १८ प्रभागांमध्ये अक्षरशः क्लीन स्वीप केला. कोथरूड, खराडी-वाघोली, औंध-बोपोडी, कात्रज, धायरी, सहकारनगर, कोंढवा यांसारख्या भागांमध्ये भाजपच्या सर्व उमेदवारांचा विजय हा संघटनात्मक ताकदीचा आणि प्रभावी प्रचाराचा परिणाम मानला जातो. मतांचे विभाजन इतकं निर्णायक ठरलं की काही प्रभागांमध्ये पराभूत उमेदवारांना मिळालेली मते ही विजयी मतांच्या अगदी जवळ होती.

या यशामागे नवमतदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. २०१४ नंतर प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या मोठी असून, त्यातील सुमारे ८० टक्के मतदार भाजपकडे वळल्याचं चित्र आहे. विरोधी पक्षांना तरुण आणि नवमतदारांपर्यंत पोहोचण्यात अपयश आल्याचं या निकालातून स्पष्ट होतं.

एकूणच, पुणे महापालिकेचा हा निकाल केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरता मर्यादित नसून, आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांसाठी तो राजकीय पक्षांना महत्त्वाचे संकेत देणारा आहे. मतांचे विभाजन, वाढती नोटाची टक्केवारी आणि भाजपची वाढती पकड-हे मुद्दे येत्या काळातील राजकारण ठरवणारे ठरणार आहेत.

## आईकडून रागाच्या भरात मुलीची हत्या

**लातूर, ता. २१ :** लातूर शहरातून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. किरकोळ कौटुंबिक वादातून एका निर्दयी आईने आपल्या अवघ्या १८ महिन्यांच्या चिमुकल्या मुलीचा जीव घेतल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पती घरी येण्यास उशीर झाला या कारणावरून निर्माण झालेल्या रागातून ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, चौगुले कुटुंब मूळचे हासेगाव येथील असून रोजगारासाठी काही काळापूर्वी लातूरमध्ये वास्तव्यास आले होते. कुटुंबातील कर्ता पुरुष विक्रम चौगुले हे उसाच्या ट्रॅक्टरवर काम करून उदरनिर्वाह करत होते. कामाच्या स्वरूपामुळे त्यांना अनेकदा रात्री उशिरापर्यंत बाहेर राहावे लागत होते. १९ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास घरात पती उपस्थित नसल्याने पत्नी अश्विनी चौगुले हिचा राग अनावर झाला. या रागाच्या भरात अश्विनीने आपल्या लहान मुली नंदिनी हिच्यावर चाकूने वार केल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे. गंभीर जखमांमुळे चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेच्या वेळी घरात असलेला ४ वर्षांचा मुलगा राजवीर याने हे सर्व दृश्य पाहिल्याची माहिती समोर आली असून, त्याच्यावरही या घटनेचा मोठा मानसिक परिणाम झाला आहे. विक्रम चौगुले कामावरून घरी परतल्यानंतर त्यांना घरात रक्ताचा सडा आणि मुलीचा निर्जीव देह दिसला. त्यांनी तातडीने शेजाऱ्यांच्या मदतीने पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी अश्विनी चौगुले हिला ताब्यात घेतले असून तिच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक वैद्यकीय तपासणीत ती मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे समजते. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कौटुंबिक तणाव आणि रागावर नियंत्रण ठेवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात भाजपकडून एबी फॉर्म दोघांना

## पक्षाचा अधिकृत उमेदवार कोण; कोणाचा पत्ता कट होणार?

**उरुळी कांचन, ता. २१ :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेसने डावललेल्या उमेदवाराला चक्क भारतीय जनता पार्टीने एबी फॉर्म दिला आहे. भाजपाकडून अगोदर ठरलेल्या उमेदवाराने एबी फॉर्मसह अधिकृत उमेदवारीचा फॉर्म स्थानिक नेते, कार्यकर्त्यांसह बुधवारी दुपारी भरला आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमात आहेत.




भाजपाकडून अधिकृतपणे जीवन महाराज शिंदे यांना उमेदवारी जाहीर झाली होती. त्यानुसार त्यांनी बुधवारी फॉर्म भरला होता. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षाकडून अधिकृतपणे उमेदवारी मागितलेले शंकर बडेकर यांना भाजपच्या जिल्हाध्यक्षांच्या लेखी पत्र दिले आहे. त्यामुळे पक्षाचा अधिकृत उमेदवार कोन उद्याचा अर्ज पडताळणीतून समोर येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून इच्छुक असूनही उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज असलेल्या शंकर बडेकर यांनी अखेर भाजपाकडून एबी फॉर्म देण्यात आला आहे. भाजपच्या या निर्णयामुळे संबंधित मतदारसंघातील समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शंकर बडेकर हे मागील अनेक दिवसांपासून मेळावे, लोकांच्या संपर्कात असल्याने व कामाचा अनुभव आणि मतदारसंघातील पकड लक्षात घेता त्यांना संधी देण्यात आली आल्याची चर्चा आहे.

कोणताही राजकीय वारसा नसतानाही केवळ समाजातील कामे व तळागाळातील नागरिकांशी असलेले हितसंबंध यामुळे त्यांना तिकीट दिल्याची चर्चा आहे. भाजपच्या विचारधारेशी सहमत होत त्यांनी पक्षात प्रवेश केला नसला तरी येत्या निवडणुकीत ते पक्षासाठी प्रभावी उमेदवार ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, ऐनवेळी येऊन शंकर बडेकर यांना अधिकृत उमेदवारीचे पत्र दिल्याने उमेदवारीचा संभ्रम कायम झाला आहे. त्यामुळे उद्याचा अर्ज पडताळणीकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहणार आहे.

## संक्षिप्त

### आंबी गावात दारू भट्टीवर कारवाई; सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त




**तळेगाव, ता. २१ :** मावळ तालुक्यातील आंबी गावच्या परिसरात पोलिसांनी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकून मोठ्या प्रमाणावर रसायने जप्त केली आहेत. ही घटना मंगळवारी (२०जानेवारी) सायंकाळी करण्यात आली. याबाबत अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस शिपाई सदानंद रुद्राक्ष यांनी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलांनी आंबी येथे दारू तयार करण्यासाठी भट्टी उभारली होती. हजारो लिटर रसायन दारू तयार करण्यासाठी भिजत घातले. याबाबत माहिती मिळाल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने छापा मारला. पोलीस पथक आल्याची चाहुल लागताच दोन्ही आरोपी महिला पळून गेल्या. पोलिसांनी घटनास्थळावरून हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे २ लाख ३६ हजार २५० रुपये किमतीचे एकूण ६ हजार ७५० लिटर रसायन जप्त केले आहे. तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

### चिंबळी गावात ड्रेनेज कामावरून कंत्राटदारावर चाकू हल्ला

**पिंपरी, ता. २१ :** चिंबळी येथे सुरू असलेले ग्रामपंचायतीच्या ड्रेनेजचे काम दोन जणांनी चाकूचा धाक दाखवून बंद पाडले. त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या कंत्राटदारावर चाकूने वार केल्याची घटना सोमवार (१९जानेवारी) सायंकाळी चिंबळी येथील बर्गे वस्ती भागात घडली. याबाबत ३२ वर्षीय तरुणाने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी जेसीबी चालवण्यासाठी घेतला आहे. जेसीबीचा चालक जेसीबीच्या साहाय्याने ग्रामपंचायतचे ड्रेनेजचे काम करत होता. त्यावेळी आरोपी तिथे आले. त्यांनी काम बंद पाडले. जेसीबी चालकाला चाकूचा धाक दाखवला. याबाबत फिर्यादी हे आरोपींना जाब विचारण्यासाठी गेले असता आरोपींनी फिर्यादी यांना मारहाण करून त्यांच्यावर चाकूने वार करत जखमी केले. आळंदी पोलीस तपास करत आहेत.

### बावधनमध्ये टेम्पोची दुचाकीला धडक

बावधन, ता. २१ : येथील सातारा-मुंबई महामार्गावरील सेवा रस्त्यावर एका भरधाव पिकअप चालकाने दुचाकीला समोरून धडक देऊन दोन जणांना गंभीर जखमी केले. ही घटना मंगळवारी (२०जानेवारी) सकाळी घडली. यामध्ये दोघेजण जखमी झाले असून पिकअप चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचा भाऊ हे दुचाकीवरून कामावर जात असताना समोरून आलेल्या पिकअप चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर चालक जखमींना मदत न करता वाहन घेऊन घटनास्थळावरून पळून गेला. बावधन पोलीस तपास करत आहेत.

### गावठी कट्ट्यासह तरुणाला अटक

**राजगुरुनगर, ता. २१ :** खेड तालुक्यातील निघोजे गावच्या हद्दीत महींद्रा सर्कल जवळ पोलिसांनी कारवाई करत एका तरुणाला बेकायदेशीररीत्या देशी बनावटीचा गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस बाळगल्या प्रकरणी अटक केली. ही कारवाई सोमवारी (१९जानेवारी) रात्री करण्यात आली. जव्हारसिंग गिलू केबट (२८, भांबोली, मूळ गाव मध्य प्रदेश) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई राजेश गिरी यांनी दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यातील पथकाने संशयावरून आरोपीची झडती घेतली असता, त्याच्याकडे हजार रुपये किमतीचा एक गावठी कट्टा आणि एक जिवंत पितळी काडतूस मिळून आले. त्यावरून त्याला अटक करण्यात आली आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

### चिंबळी फाटा येथे जुगार अड्ड्यावर छापा; पाच जणांवर गुन्हा

**कुरुळी, ता. २१ :** कुरुळी येथील चिंबळी फाटा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांविरुद्ध कारवाई केली आहे. ही कारवाई मंगळवारी (२० जानेवारी) सायंकाळी करण्यात आली. याप्रकरणी पोलीस शिपाई राजेश गिरी यांनी दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चिंबळी फाटा येथे लोकांकडून पैसे घेऊन जुगार खेळत आणि खेळवत होते. या छाप्यात पोलिसांनी ४ हजार ४८० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

# तळवडे, कळस परिसरातील वीज पुरवठा सक्षमीकरणाला बुस्टर

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश



**पिंपरी-चिंचवड, ता. २१ :** तळवडे व दिघी औद्योगिक परिसरातील वाढत्या वीज मागणीमुळे निर्माण होणाऱ्या वारंवार बिघाड व सक्तीच्या भारनियमनाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महावितरणकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. औद्योगिक व आय.टी. क्षेत्राच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन २२/२२ के. व्ही. कॅनबे उपकेंद्र तसेच २२/११ के.व्ही. जिआरएफई सेंटर कळस येथे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारणीचे डीपीआर (उ्झठ) प्रस्तावित करण्यात आले आहेत. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

सध्या तळवडे परिसरातील विद्युत यंत्रणा अतिभारित व संयुक्त स्वरूपाची असल्यामुळे वारंवार ब्रेकडाऊन होत असून प्रमुख औद्योगिक व आय.टी. परिसरांचा वीज पुरवठा खंडित होत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर महसूल नुकसान व ग्राहकांमध्ये नाराजी आहे. याबाबत महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मे-२०२५ मध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती. तसेच, विधानसभा अधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी केली होती. त्याला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तसेच, २२/११ के. व्ही. जिआरएफई सेंटर कळस उपकेंद्रातील १० एमव्हीए क्षमतेचा एकमेव ट्रान्सफॉर्मर सध्या जवळपास ९५ टक्के भारावर कार्यरत आहे. परिणामी उच्चांक मागणी दरम्यान दिघी व व्हीएसएनएल फीडरवर दररोज २ ते ३ तास सक्तीचे भारनियमन करावे लागत आहे. ही समस्या कायमची दूर करण्यासाठी जिआरएफई सेंटर कळस येथे अतिरिक्त १० एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारण्याचा डीपीआर प्रस्तावित करण्यात आला आहे. यामुळे दिघी परिसरातील औद्योगिक व निवासी ग्राहकांना अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

**औद्योगिक विकासाला चालना**


कॅनबे आणि कळस येथील दोन्ही प्रकल्पांमुळे तळवडे दिघी औद्योगिक पट्ट्यातील वीज व्यवस्था अधिक सक्षम होऊन नवीन उद्योग, आय.टी. पार्क व गुंतवणुकीस चालना मिळणार आहे. तसेच वारंवार होणारे बिघाड, भारनियमन व महसूल नुकसान लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तळवडे परिसरातील विद्यमान पायाभूत सुविधा त्यांच्या कमाल क्षमतेवर कार्यरत असून भविष्यातील औद्योगिक भारवाढ लक्षात घेता २२/२२ के.व्ही. कॅनबे उपकेंद्राची उभारणी अत्यावश्यक ठरली आहे. या उपकेंद्रामुळे औद्योगिक ग्राहकांना विश्वासार्ह, सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे.

> तळवडे व दिघी परिसरातील औद्योगिक, आय.टी. तसेच स्थानिक नागरिकांना सातत्यपूर्ण, दर्जेदार आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणकडून कॅनबे उपकेंद्र व जिआरएफई सेंटर कळस येथे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर उभारणीचा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या औद्योगिक भारामुळे निर्माण झालेल्या समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल. या कामांसाठी आवश्यक त्या सर्व प्रशासकीय मंजुरी व पाठपुराव्यासाठी मी स्वतः लक्ष घालणार असून, पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक विकासाला कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही,
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यास सुरुवात

## १८७ कोटींच्या निधीतून कुणाकुणाला मिळणार लाभ?

**जळगाव, ता. २१ :** मागील वर्षी जुलै ते ऑक्टोबर या काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पूरस्थितीमुळे जळगाव जिल्ह्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले होते. अनेक ठिकाणी उभी पिके पूर्णपणे नष्ट झाली होती, तर काही भागांत शेतजमीन पाण्यासोबत वाहून गेली होती. या आपत्तीमुळे हजारो शेतकरी अडचणीत सापडले होते. खरीप हंगामात झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला होता आणि रब्बी हंगाम कसा पार पाडायचा, असा प्रश्न निर्माण झाला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार मंजूर केलेली मदत आता टप्प्याटप्प्याने थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होऊ लागली असून,



त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळत आहे.

अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन, मका, भुईमूग यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांचे संपूर्ण उत्पादन हातातून गेले होते. पावसामुळे शेतातील माती खरडून गेल्याने जमिनीची सुपीकताही कमी झाली. खरीप हंगामात नुकसान झाल्यानंतर किमान रब्बी हंगामात तरी उत्पन्न मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी ठेवली होती. मात्र बियाणे, खते, मशागत आणि इतर खर्चासाठी आवश्यक निधी नसल्याने रब्बी पेरणी अडचणीत आली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने तीन हेक्टर क्षेत्राच्या मर्यादित प्रतिहेक्टर १०००० रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. या मदतीचा उद्देश शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा शेती उभी करण्यास हातभार लागणार आहे.

या योजनेअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील ३५५४८७ शेतकऱ्यांसाठी २७० कोटी ९२ लाख ६४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापैकी १५ जानेवारीअखेरीस २७१०२७ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट १८७ कोटी ४३ लाख ८ हजार ७४३ रुपये जमा करण्यात आले आहेत. सुमारे ७० टक्के शेतकऱ्यांना मदत मिळाल्याने जिल्ह्यात समाधान व्यक्त होत असून उर्वरित शेतकऱ्यांनाही लवकरच मदत मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# रायगड–पेणमध्ये ग्रोथ सेंटर उभं राहणार : मुख्यमंत्री

**पुणे, ता. २१ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पहिल्याच दिवशी १४.५ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. हे करार १९ विविध कंपन्यांसोबत झाले असून यातून राज्यात १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. अशातच आता दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे.

राज्य सरकारने दावोस आर्थिक परिषदेतरायगड-पेणग्रोथसेंटरउभारण्याच्यादृष्टीने प्रस्ताव मांडला होता. यासाठी दावोसमध्ये एक महत्त्वाचा सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार येत्या काही महिन्यांमध्ये रायगड आणि पेण परिसरात एक महत्त्वाचा प्रकल्प येणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात फक्त गुंतवणूकच येणार नाही तर आधुनिक तंत्रज्ञान आणि ज्ञानही भारतात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिषद माहिती दिली.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उद्योग उभारता येतील.शहरी नियोजनासंदर्भात महाराष्ट्र सरकारने दावोसमध्ये केलेल्या करारांमुळे आपली शहर नियोजनाची क्षमता वाढणार आहे. आगामी काळात महाराष्ट्रात दळणवळणाच्या दृष्टीने चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास या गुंतवणुकीमुळे मदत होईल.

कंपन्यांची नावे पुढीलप्रमाणे : रिपब्लिक ऑफ कोरियाचा हनवा ग्रूप, स्वित्झर्लंडची एसएसबी कंपनी, अमेरिकेची फेडेक्स, फिनलँडची रिव्हर रिसायकल, दुबईची एमजीएसए, सिंगापूरची मेपल ट्री आणि ट्रिबेका डेव्हलपर्स.

# लाडक्या बहीणींना दिलासा; ई–केवायसीबाबत तटकरेंनी दिली माहिती

**मुंबई, ता. २१ :** लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाडक्या बहिणींना ईकेवायसी करण्यास अनिवार्य करण्यात आले होते. त्यासाठी ३१ डिसेंबर ही शेवटची तारीख दिली होती. मात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसलीमध्ये तांत्रिक अडचणी असल्याने डिसेंबरचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातील महिलांनी मोर्चे काढले आणि आपला संताप व्यक्त केला. याप्रकरणी आता राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.


लाडक्या बहिणींना दिलासा देत महाराष्ट्रातील महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी ट्विट करत सांगितले की, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत ईकेवायसी करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु काही कारणांनी ईकेवायसी करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळेच योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, असं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत ईकेवायसी करण्याची मुदत देण्यात आली होती. मात्र काही कारणास्तव ईकेवायसी करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. आदिती तटकरे यांच्या आदेशानंतर, ज्या लाडक्या बहिणींनी चुकीचा पर्याय निवडला होता त्यांची आता पडताळणी होणार आहे. त्यामुळे चुकीची माहिती असल्यास त्यात दुरुस्ती करता येणार आहे आणि पात्र महिलांना पैसे मिळू शकणार आहेत.

# खासगी संस्थांकडून भू–करमापकांची नियुक्ती; निविदा प्रक्रियेला सुरुवात

**पुणे, ता. २१ :** जमिनीची मोजणीएकएकामहिन्यातकरण्यासाठी भूमी अभिलेख विभागाने कर्नाटक, आंध्र प्रदेशाच्या धर्तीवर खासगी संस्थेद्वारे भू-करमापक नियुक्तीचा निर्णय घेतला असून, त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

राज्यात विविध प्रकल्पांची कामे सध्या सुरू आहेत. या प्रकल्पांसाठी भूसंपादनही करण्यात येत असून त्यासाठी जमिनीची मोजणी करणे बंधनकारक आहे. मोजणी प्रक्रिया गतीने व्हावी, यासाठी खासगी संस्थांद्वारे भू-करमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. दस्त नोंदणीपूर्वीच जमिनींची मोजणी करण्यात येणार आहे. त्यासाठी खासगी संस्थांना पॅनेलवर घेण्यात येणार आहे.



राज्यात ३ हजार ४०० इतके भू-करमापक आहेत. भूकरमापकांच्या तुलनेत प्रलंबित मोजण्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे मोजण्यांचा कालावधी हा ९० दिवसांवर गेला आहे. आता हा कालावधी ३० दिवसांवर आणण्यात येणार आहे.

खासगी संस्थांकडील परवानाधारक भू-करमापक भूमी अभिलेख विभाग नियुक्ती करणार असून त्यासाठी निविदा प्रक्रिया नुकतीच सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यात किती प्रमाणात भूकरमापक उपलब्ध होतात हे पाहून दुसऱ्या टप्प्यात पुन्हा खासगी संस्थांना सहभागी करून घ्यायचे की नाही, याचा निर्णय होणार असल्याची माहिती महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

राज्यात पुणे, ठाणे, अहिल्यानगर, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या सारख्या जिल्ह्यांमध्ये मोजण्यांची प्रकरणे अधिक आहे. खासगी संस्थांमार्फत घेण्यात येणाऱ्या भू-करमापकांना नियुक्त केल्यानंतर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यांचे स्वतंत्र लॉग इन तयार करण्यात येईल. तसेच, त्यांना स्वतंत्र परवाना देण्यात येणार आहे.

# डेटींग ॲपवरील ओळख महागात; कोंढव्यात तरुणाला लुटले

**पुणे, ता. २१ :** डेटींग ॲपवर झालेली ओळख एका तरुणाला महागात पडली. कोंढवा भागात एका तरुणाला बोलावून त्याच्याकडील दागिने आणि रोकड असा ८० हजार रुपयांचा ऐवज लुटण्यात आल्याची घटना घडली.




या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार वर्षीय तरुण नगर रस्त्यावरील वाघोली परिसात राहायला आहे. ११ जानेवारी रोजी तो मोबाइलवर एक डेटींग प पाहत होता. त्या वेळी एकाने त्याला संदेश पाठविला. त्यानंतर तक्रारदार तरुणाने त्याच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. कोठे राहतो ? अशी विचारणा तरुणाने त्याच्याकडे केली. त्यानंतर आरोपीने रात्री नऊच्या सुमारास कोंढव्यातील शीतल पेट्रोल पंपाजवळ तरुणाला भेटायला बोलाविले. त्या वेळी तीन तरुण तेथे थांबले होते. तरुणांनी त्याला तीक्ष्ण शस्त्राचा धाक दाखविला.

कोंढव्यातील पानसरेनगर परिसरात असलेल्या मोकळ्या जागेत तरुणाला घेऊन गेले. त्याला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याच्याकडील मोबाइल संच, अंगठी काढून घेतली. तरुणाला धमकावून एटीएममधून पैसे काढण्यास सांगितले. तरुणाकडील रोकड, मोबाइल संच, अंगठी असा ऐवज काढून घेतला. या प्रकाराची वाच्यता केल्यास जिवे मारण्याची धमकी देऊन तिघे जण पसार झाले. पसार झालेल्या चोरट्यांचे वय अंदाजे २० ते २२ वर्ष असल्याचे तक्रारदार तरुणाने फिर्यादीत म्हटले आहे. घाबरलेल्या तरुणाने नुकतीच कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी शीतल पेट्रोल पंप परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक गावडे तपास करत आहेत.

# शिरुरला इच्छुक उमेदवारांचे अर्ज दाखल

**योगेश मारणे**

शिरूर, ता. २१ : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रमुख पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपसह प्रमुख पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज शेवटच्या दिवशी मोठया प्रमाणात शक्तीप्रदर्शन करत अनेक दिग्गज उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. शिरुर येथील तहसील कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना या प्रमुख पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

शिरुर तालुक्यात अजूनही पक्ष व आघाड्याबाबत संभ्रम कायम आहे. तालुक्यातील जवळपास गटामध्ये ही निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत. तहसील कार्यालयासमोरील




आवारात जत्राच भरलेली दिसत होती. शक्तीप्रदर्शनामुळे शिरुर एसटी स्थानक ते पंचायत समिती पर्यंत चा रस्ता माणसांच्या गर्दीने फुलून गेला होता.हातात पक्षाचे झेंडे, उमेदवारांचे फोटो असलेले स्टिकर घेऊन घोषणा देत उमेदवारी अर्ज भरले.

अनेक इच्छुक उमेदवारांनी पक्षामार्फत उमेदवारी अर्ज दाखल केलेले असले तरीही अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी एबी फॉर्म आल्यामुळे बहुतांश गटात बंडखोरी होण्याची शक्यता कमी दिसून आली. तर उमेदवारी न मिळाल्याने काही नाराज इच्छुकांनी अधिकृत पक्षापासून बाजूला जात ऐवेळी दुसऱ्या पक्षाचा झेंडा हाती घेत एबी फॉर्म जोडून देत आपली उमेदवारी यंदा कोणत्याही परिस्थितीत लढायचंच या इराद्याने आपली उमेदवारी अंतिम केली.

**विविध पक्षांच्या एबी फॉर्म ची दुकानदारी**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. या निवडणुकीत प्रमुख पक्षामध्ये रात्रीतून घडलेल्या घडामोडीमुळे शिरुर तहसील कार्यालय येथे विविध पक्षांचे प्रमुख प्रतिनिधी या निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांना पक्षाचा एबी फॉर्म घेता का असे म्हणायची वेळ आल्याचे दिसले. दरम्यान, मागील सहा महिन्यापासून पक्षाचे चिन्ह व विचार कालपर्यंत घरोघरी पोचून प्रचार केला, मात्र ऐनवेळी झालेल्या काही राजकीय घडामोडीमुळे त्याच पक्षाने उमेदवारी डावलल्याने ऐनवेळी दुसऱ्या पक्षाचा एबी फॉर्म मिळण्यासाठी फारशी धावाधाव न करता विविध पक्षाचे प्रतिनिधी एबी फॉर्म घेऊन असल्याने इच्छुक उमेदवारांचा जीव भांड्यात पडल्याचे दिसून आले.

सध्याच्या राजकीय पक्षांतरामुळे मुळ पक्ष, विचार, तत्व व चिन्ह या साऱ्यांना तिलांजली देण्याची वेळ तालुक्यातील रांजणगाव गणपती - कारेगाव जिल्हा परिषद गट वगळता अन्य गटातील इच्छुक उमेदवारांवर आली.

जनमानसाचा निडर आवाज...
पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# मुंबईच्या महापौर पदाबाबत सस्पेंस कायम; एकनाथ शिंदेंनी गाठली दिल्ली



**मुंबई, ता. २१ :** मुंबई महानगरपालिकेत ८९ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. उद्धव ठाकरेंची शिवसेना ६५ जागांवर विजयी झाली. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला अवघ्या २९ जागांवर विजय मिळवता आला आहे. मात्र, भाजपला बहुमतासाठी आवश्यक असलेला ११४ चा आकडा गाठण्यासाठी त्यांना शिंदे यांच्या २९ नगरसेवकांची साथ अनिवार्य आहे.

महापालिका निकालानंतर आता महापौर पदाबाबत सस्पेंस कायम आहे. भाजपसह शिवसेना (शिंदे गट) ने आपल्या पक्षाच्या नेत्याला महापौर बनवण्याची मागणी केली आहे.तर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मुंबईतील पेचाची दखल घेतल्याची माहिती पुढे येत आहे. महापौर पदाविषयी कुठली तडजोड न करण्याची पक्ष नेतृत्वाची ठाम भूमिका असल्याचे समजते. संख्याबळात सर्वांत मोठा पक्ष ठरल्याने महापौर पदावर आपलाच हक्क आहे. ती बाब मित्रपक्षापर्यंत योग्य प्रकारे पोहचवा, असे संकेत भाजपच्या गोटयातून देण्यात आल्याची माहिती देखील समोर आली आहे.

यादरम्यान आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रात्री दिल्ली गाठत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्याची माहिती समोर येत आहे. अचानकपणे शिंदे यांचा हा दिल्ली दौरा झाल्याने शिवसेना शिंदे गट अजूनही आपल्या मागण्यांवर ठाम असल्याचे म्हटले जात आहे.

दरम्यान, दिल्लीत मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम आणि शिंदे गटाचे नेते राहुल शेवाळे यांच्यात चर्चा झाल्याचे वृत्त आहे. मंगळवारी रात्री एकनाथ शिंदे हे देखील दिल्लीत होते. दिल्लीतील बैठकीत महापौर आणि इतर समितीबाबत चर्चा केली असल्याचे म्हटले जात आहे.

# कागलमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'; ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**कोल्हापूर, ता. २१ :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोल्हापुरात मोठी धडक कारवाई करत तब्बल ६२.५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत गोव्यात तयार होणारी आणि महाराष्ट्राचे लेबल लावून बेकायदेशीर विक्रीसाठी नेली जाणारी सुमारे ४० लाख रुपयांची देशी दारू पकडण्यात आली आहे. ही दारू नागपूर जिल्ह्यात विक्रीसाठी नेली जात असल्याची माहिती प्राथमिक तपासात उघड झाली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कागल विभागाला मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार देवगडनिपाणी राज्य महामार्गावरील बसवडे फाटा (ता. कागल) येथे सापळा रचण्यात आला होता. यावेळी MH-४०-CM-२५३५ क्रमांकाच्या टाटा मोटर्स कंपनीच्या ट्रकची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकच्या पुढील भागात देशी दारूचे बॉक्स तर मागील बाजूस पिण्याच्या पाण्याचे बॉक्स लपवून ठेवलेले आढळून आले. तपासणीमध्ये रॉकेट देशीदारू संघ या ब्रँडचे एकूण १००० बॉक्स आढळले. प्रत्येक बॉक्समध्ये ९० मिली क्षमतेच्या १०० बाटल्या असल्याने एकूण ९ लाख देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. बाटल्यांवर प्रकार डिस्टिलरी प्रा. लि., राहाता, जि. अहमदनगर असा उल्लेख असला तरी प्राथमिक चौकशीत ही दारू गोव्यात तयार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

या कारवाईत दारू, पाण्याचे बॉक्स, ट्रक, मोबाईल फोन आणि कागदी बॉक्स असा एकूण ६२,५०,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये ट्रकची किंमत सुमारे २० लाख रुपये आहे.

या प्रकरणी ट्रक चालक सलीम खयूम शेख (रा. आदिलाबाद, तेलंगणा, सध्या यवतमाळ) आणि क्लिनर सूरज तेजराव सावंत (रा. यवतमाळ) यांना अटक करण्यात आली आहे. दोघांविरोधात महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम, भारतीय न्याय संहिता आणि ट्रेडमार्क अ‍ॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर दारू वाहतुकीला आळा घालण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने सुरू केलेल्या मोहिमेतील ही मोठी कारवाई मानली जात आहे. अवैध मद्य निर्मिती, साठवणूक किंवा विक्रीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ३३३३ किंवा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ८६५७९१९००१ वर संपर्क साधावा, असे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषदेसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र

## 'घड्याळ' आणि 'तुतारी'च्या युतीने भाजपचे टेन्शन वाढणार?




**पुणे, ता. २१ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत भाजपकडून झालेल्या दणदणीत पराभवानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर राजकीय प्रतिष्ठा टिकवण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. त्यातूनच आता पुणे जिल्हा परिषद निवडणूक हीच त्यांच्यासाठी कमबॅकची संधी मानली जात असून, त्यांनी तातडीने ग्रामीण राजकारणाची मोर्चेबांधणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येऊन एकाच घड्याळ चिन्हावर जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

महापालिका निवडणुकीत दोन वेगवेगळ्या चिन्हांवर निवडणूक लढवल्याचा मोठा फटका बसला होता. त्याची पुनरावृत्ती जिल्हा परिषद निवडणुकीत होऊ नये, यासाठी अजित पवार आग्रही आहेत. त्यामुळेच शरद पवार गट आणि अजित पवार गट पुन्हा एकत्र येऊन ग्रामीण भागात ताकद दाखवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पक्षात फुट पडल्यानंतर १४ जिल्हा परिषद सदस्य शरद पवार यांच्यासोबत गेले होते. लोकसभा निवडणुकीत त्याचा थेट परिणाम दिसून आला. हीच चूक पुन्हा होऊ नये, यासाठी एकाच चिन्हावर निवडणूक लढवण्यावर भर दिला जात आहे.

पुणे जिल्हा हा गेल्या अनेक वर्षांपासून अजित पवार यांचा बालेकिल्ला राहिला आहे. पालकमंत्री म्हणून त्यांनी निधीवाटप, विकासकामे आणि संघटन मजबूत करण्यावर विशेष भर दिला. ग्रामीण भागातील अनेक तरुणांना त्यांनी राजकारणात सक्रिय केले. मात्र, राज्यात सत्तेत आल्यानंतर भाजपने पुणे जिल्ह्यातील अजित पवार यांच्या वर्चस्वाला आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत आता भाजप आणि राष्ट्रवादी यांच्यात थेट सामना रंगणार आहे.

सध्या पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीकडे ४४, शिवसेनेकडे १३, काँग्रेसकडे ७, भाजपकडे ७ आणि इतरांकडे ४ सदस्य आहेत. सत्ता संतुलनाची स्थिती असली तरी ग्रामीण भागात अजूनही पवार समर्थक मतदारांचा प्रभाव कायम आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद निवडणूक अजित पवार यांच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे. राष्ट्रवादीची फुट मिटते का, दोन्ही गट खरोखरच एकत्र येतात का आणि भाजपसमोर ग्रामीण पुण्यात पवारांची ताकद पुन्हा सिद्ध होते का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# इंदापुरात राष्ट्रवादीचा 'मास्टर प्लॅन'; अंकिता पाटील 'घड्याळ' चिन्हावर लढणार

**इंदापूर, ता. २१ :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्रित रणनिती आखल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. महापालिका निवडणुकीतील पराभवातून धडा घेत आता ग्रामीण राजकारणात ताकद एकवटण्यासाठी शक्य त्या ठिकाणी घड्याळ आणि शक्य त्या ठिकाणी तुतारी वाजविणारा माणूस या दोन्ही चिन्हांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इंदापूर तालुक्यातही याच स्ट्रॅटेजीवर शिक्कामोर्तब झाला आहे.

शरद पवार गटातील ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील ठाकरे या इंदापूर तालुक्यातील बावडा जिल्हा परिषद गटातून घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. बुधवारी त्या अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, दोन राष्ट्रवादी एकत्र लढण्याचा निर्णय झाल्यानंतर त्यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. अंकिता पाटील यांच्या माध्यमातून पाटील कुटुंबाची पुढची पिढी ग्रामीण राजकारणात अधिक सक्रिय होत असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, इंदापूर पंचायत समिती निवडणुकीत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आपले पुत्र श्रीराज भरणे यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवत आहेत. श्रीराज दत्तात्रय भरणे बोरी पंचायत समिती गणातून बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, यामुळे भरणे कुटुंबातील दुसरी पिढी प्रत्यक्ष राजकारणात प्रवेश करत आहे.



महापालिका निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र बैठक घेऊन ही संयुक्त रणनिती ठरवली. जिथे घड्याळ चिन्ह अधिक फायदेशीर ठरेल तिथे ते वापरण्यात येईल, तर काही ठिकाणी तुतारी चिन्हावर उमेदवार उभे केले जातील. पुणे जिल्ह्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये हीच रणनीती राबवली जाणार आहे.

विशेष म्हणजे, राष्ट्रवादीच्या चिन्हाबाबतचा वाद सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर असतानाच राजकीय पातळीवर दोन्ही गटांमध्ये अंडरस्टँडिंग तयार झाल्याचे दिसते. महापालिका निवडणुकीत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एकत्र लढूनही भाजपकडून झालेल्या दारुण पराभवाने दोन्ही गट अधिक जवळ आले आहेत.

मात्र अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे या एकत्र येण्याबाबत वेगळा सूर लावत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तरीही जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादीची ताकद एकत्रितपणे दाखवण्याचा निर्धार दोन्ही गटांनी केल्याचे स्पष्ट होत आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



### कारल्याची भाजी का खायला हवी, जाणून घ्या

कारलं म्हटल्यावर अनेकजण नाक मुरडतात. परंतु आपल्या आहारात कारल्याची भाजी समाविष्ट करण्याचे खूप फायदे आहेत. कारलेचा उल्लेख केल्यावरच अनेकांचे तोंड कडू होते. कारल्यामुळे रक्त शुद्ध होते आणि शरीराला अ, ब आणि क जीवनसत्त्वे मिळतात. आयुर्वेदात कारल्याला करवेलक असे म्हणतात, ज्यामध्ये अशुद्धता, उच्च रक्तातील साखर आणि अगदी जंत देखील शुद्ध करण्याची क्षमता असते. कारल्याची भाजी खाण्याचे आपल्याला खूप सारे आरोग्यवर्धक फायदे मिळतात.

स्तनपान करणाऱ्या महिलांसाठी कारले हे औषध म्हणून काम करते. मुख्य म्हणजे स्तनदा मातांमध्ये दूध उत्पादक हार्मोन्सचे उत्पादन उत्तेजित करते. डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच ते सेवन करा. जर तुमच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचे जखमा असतील तर कारल्याची पेस्ट लावणे औषध म्हणून काम करते. ते जखमा बरे करण्यास मदत करते, संसर्ग रोखते आणि सूज कमी करते.

चेहऱ्यावर भरपूर मुरुमे हे रक्तातील अशुद्धतेचे लक्षण आहे. दररोज कारल्याचा रस सेवन करणे रक्त शुद्ध करण्यासाठी फायदेशीर आहे. ते रक्त शुद्ध करते आणि चेहऱ्यावर चमक आणते. ते खाज आणि कोरडेपणापासून देखील आराम देते. कारल्याची ही सर्व मूळ कारणे संतुलित करते आणि शरीराची स्वतःला बरे करण्याची क्षमता पुनर्संचयित करते.

# शिवसेना पक्ष अन् चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा लांबणीवर?

**मुंबई, ता. २१ :** शिवसेना पक्षामध्ये फुट पडल्यानंतर एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे असे दोन गट निर्माण झाले. मात्र शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह नेमकं कोणाचं? हा वाद सध्या न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. शिवसेनेसह मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यावर सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात होणार होती.



सर्वोच्च न्यायालयाने मागील तारखेला या प्रकरणातील युक्तिवादाचे वेळापत्रकही ठरवून दिले होते. मात्र सतत तारीख पे तारीख सुरू आहे. तांत्रिक आणि विशेष कामकाजामुळे ही सुनावणी पुन्हा एकदा अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकण्याची चिन्हे आहेत. याप्रकरणी ठाकरेंची बाजू मांडणारे ॲड. असीम सरोदे यांनीच सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून हा निकाल अद्याप लांबणीवर पडणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

ॲड. असीम सरोदे यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर सुप्रीम कोर्टाच्या एका नोटीसचा फोटो टाकत त्यासोबत पोस्ट लिहीली आहे. सर्वोच्च न्यायालायने आज मूळ शिवसेना पक्षाची सुनावणी सुरु करू असे मागच्या तारखेला सांगून ठेवले होते. अगदी कुणी किती वेळ युक्तिवाद करणार हे सुद्धा सांगितले होते. बुधवारी सकाळी ११.३० वाजता मूळ शिवसेना आणि मूळ राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या प्रकरणांवर सुनावणी सुरु केली तरच निदान सुरुवात होऊन उद्या सुनावणी पुढे राहण्याची शक्यता आहे.

परंतु आज दुपारी एक वाजेपर्यंतच चीफ जस्टीस सूर्यकांत त्यांच्या नियमित कोर्टातील कामकाज करतील कारण दुपारी एक वाजतापासून चीफ जस्टीस आणि न्या. जोयमाला बागची यांच्यासोबत गठीत करण्यात आलेल्या विशेष न्यायालयाचे कामकाज करतील. अरावली डोंगर रांगांबाबत १०० मीटर उंचीच्या पेक्षा जास्त असतील त्यांनाच डोंगर मानणार असा अहवाल सरकारतर्फे कोर्टात दाखल झाला व त्याला तत्कालीन चीफ जस्टीस भूषण गवई साहेब यांनी मान्यता दिली.

तो निर्णय पर्यावरण विरोधी असल्याबाबत केसेस वर आज तातडीची सुनावणी दुपारी एक वाजता होणार आहे. त्यामुळे शिवसेना सत्तासंघर्ष- पक्ष पळविणे, धनुष्यबाण चिन्ह याबाबतची सुनावणी घेतली जाईल अशी आशा करता येणार नाही, असे ॲड. असीम सरोदे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. यावरून धनुष्यबाण आणि शिवसेना हे मूळ नाव आणि चिन्ह शिंदेंना मिळणार की उद्धव ठाकरेंना ह्याचे उत्तर अद्यापही प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

## मैत्रीच्या जाळ्यात ओढून लूटमारीच्या घटना

**पुणे, ता. २१ :** डेटिंग पच्या माध्यमातून तरुणांना जाळ्यात ओढून लुटमारीच्या घटना वाढल्या आहेत. मंगळवार पेठेतील जुना बाजार परिसरात एका तरुणाला बोलावून लुटण्यात आल्याची घटना घडली होती, तसेच मगरपट्टा भागातील एका संगणक अभियंत्याला चोरट्यांनी लुटले होते. सिंहगड रस्ता परिसरातील एका व्यावसायिकाला धायरीत बोलावून त्याला लुटण्यात आल्याची घटना गेल्या वर्षी घडली होती. या प्रकरणाचा तपास करुन पोलिसांनी चोरट्यांना अटकही केली होती. डेटिंग पच्या जाळ्यात ओढून तरुणाला धमकावून लुटणे, तसेच त्यांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहे. समाज माध्यमातून शक्यतो अनोळखी व्यक्तींशी मैत्री करु नये, तसेच डेटींग अपच्या आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. डेटीग पवर झालेल्या ओळखीतून पाषाण रस्त्यावरील एका संशोधन संस्थेतील तरुणाचा सूस परिसरातील टेकडीवर खून करण्यात आल्याची घटना वर्षभरापूर्वी घडली होती.

# रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये मृतदेह गायब?

## नातेवाइकांचा गंभीर आरोप ; प्रशासनाकडून मात्र सारवासारव

**पुणे, ता. २१ :** पुण्यातील नामांकित रुबी हॉल हॉस्पिटल एका गंभीर आणि धक्कादायक प्रकारामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील रहिवासी सुनीता भगत (वय ५५) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर त्यांचा मृतदेह काही काळ गायब असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून, हॉस्पिटल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.





सुनीता भगत यांना १८ जानेवारी रोजी उपचारासाठी रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. मात्र १९ जानेवारी रोजी सकाळी डॉक्टरांनी त्यांच्या निधनाची माहिती नातेवाईकांना दिली. मृत्यूनंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मृतदेह ताब्यात घेण्यासाठी नातेवाईक हॉस्पिटल प्रशासनाकडे गेले. मात्र, अपेक्षेप्रमाणे मृतदेह ताब्यात देण्यात आला नाही, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, बराच वेळ प्रतीक्षा करूनही मृतदेह देण्यात आला नाही. त्यानंतर अचानकपणे मृतदेह एका वेगळ्याच रुग्णवाहिकेतून हॉस्पिटलच्या बाहेर आणण्यात आला. हा प्रकार पाहून कुटुंबीय हादरून गेले. मृतदेह नेमका कुठे होता, तो दुसऱ्या रुग्णवाहिकेतून का आणण्यात आला, याबाबत विचारणा केली असता प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर देण्यात आले नसल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. या घटनेमुळे कुटुंबीयांमध्ये तीव्र संतापाची भावना असून त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाविरोधात तक्रार दाखल केली आहे. मृत्यूनंतर मृतदेहाची जबाबदारी, ओळख आणि हस्तांतरण ही प्रक्रिया अत्यंत संवेदनशील असते. अशा वेळी निष्काळजीपणा किंवा गोंधळ निर्माण होणे ही बाब केवळ कुटुंबीयांसाठी मानसिक आघात ठरत नाही, तर आरोग्य व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत करते.

या प्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्तांनी लिखित तक्रार प्राप्त झाल्याची माहिती देत कायदेशीर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, नातेवाईकांनी रुबी हॉल हॉस्पिटलवर कठोर कारवाईची मागणी केली असून, प्रशासनाकडून अद्याप अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे.

## विराट कोहलीने पुन्हा एकदा नंबर वनची खुर्ची पटकावली

**पुणे, ता. २१ :** आयसीसी वनडे क्रमवारीत अवघ्या एका आठवड्यात मोठा उलथापालथीचा नाट्य पाहायला मिळालं आहे. भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडेत दमदार खेळी करत पुन्हा एकदा नंबर वनची खुर्ची पटकावली होती. मात्र ही मक्तेदारी फार काळ टिकू शकली नाही. न्यूझीलंडचा आक्रमक फलंदाज डॅरिल मिशेलने ऐतिहासिक कामगिरी करत थेट आयसीसी वनडे क्रमवारीत अव्वल स्थान मिळवलं आहे.



भारत-न्यूझीलंड वनडे मालिका संपल्यानंतर जाहीर करण्यात आलेल्या ताज्या क्रमवारीत मिशेलने विराट कोहलीला मोठ्या फरकाने मागे टाकलं. मागील आठवड्यात मिशेल केवळ एका रेटिंग पॉइंटने दुसऱ्या स्थानावर होता. मात्र मालिकेतील सातत्यपूर्ण आणि प्रभावी फलंदाजीमुळे त्याने ८४५ रेटिंगसह आपल्या वनडे कारकिर्दीतील सर्वोच्च स्थान गाठलं आहे. हे रेटिंग इतकं भक्कम आहे की सध्या त्याला अव्वल स्थानावरून हटवणं सोपं दिसत नाही.

विराट कोहलीने मालिकेतील अखेरच्या सामन्यात शतक झळकावलं असलं, तरी भारताला सामना आणि मालिका गमवावी लागली. वैयक्तिक कामगिरी चांगली असूनही संघाच्या पराभवाचा परिणाम क्रमवारीत दिसून आला. कोहली आता ७९५ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. महत्त्वाचं म्हणजे, कोहली पुढील काही महिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर राहणार असल्याने त्याला लवकरच नंबर वन स्थान पुन्हा मिळवणं कठीण ठरू शकतं.



## भूकरमापक परिक्षेचा निकाल ३० जानेवारीला होणार प्रसिद्ध

**पुणे, ता. २१ :** राज्य शासनाच्या भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गातील ९०३ पदांसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल ३० जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. भूमि अभिलेख विभागाच्या महाभूमि या संकेतस्थळावर हा निकाल उमेदवारांना पाहता येणार आहे, अशी माहिती जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली.

भूकरमापक पदाच्या भरतीसाठी ३४ हजार ५३२ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी ३० हजार ६५६ उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली. ही परिक्षा १३ नोव्हेंबर २०२५ आणि १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत प्रति दिन दोन सत्रांमध्ये घेण्यात आली.

पुणे विभागात भूकरमापकांची ८३ पदे असून त्यासाठी २ हजार ९७३ इतक्या उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली. कोकण विभागातील २५९ जागांसाठी ८ हजार १४८ उमेदवारांनी, नाशिक विभागातील १२४ जागांसाठी ४ हजार ३४० उमेदवारांनी परिक्षा दिली.

तर छत्रपती संभाजीनगर विभागातील २१० जागांसाठी ८ हजार २७६ उमेदवारांनी तर, अमरावती विभागातील ११७ जागांसाठी ३ हजार ६७९ उमेदवारांनी अणि नागपूर विभागातील ११० जागांसाठी ३ हजर २४० उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली आहे.

ऑनलाईन परिक्षेस उपस्थित सर्व उमेदवारांचा विभागनिहाय गुणानुक्रमे निकला ३० जानेवारी २०२६ रोजी https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर तसेच संबधित उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे भूमि अभिलेख विभागाकडून सांगण्यात आले.

# हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लवकरच धावणार

**पुणे, ता. २१ :** पुणेकरांसाठी दिलासादायक आणि आनंदाची बातमी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ज्या मेट्रो मार्गाची नागरिक आतुरतेने वाट पाहत होते, तो बहुचर्चित हिंजवडीशिवाजीनगर मेट्रो मार्ग अखेर प्रत्यक्षात येण्याच्या टप्प्यात पोहोचला आहे. पुण्यातील आयटी हब हिंजवडीपासून शहराच्या मध्यवर्ती भागातील शिवाजीनगरपर्यंतचा २३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग ३ मार्च २०२६ पासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.



हिंजवडी-शिवाजीनगर हा मार्ग पुण्यातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि वाहतूक कोंडीने हैराण झालेल्या रस्त्यांपैकी एक आहे. रोज लाखो नोकरदार, विद्यार्थी आणि व्यापारी या मार्गावरून प्रवास करतात. हिंजवडीतील आयटी पार्क, वाकड, बालेवाडी, बाणेर, विद्यापीठ परिसर आणि शिवाजीनगर हे सगळे भाग एकमेकांशी थेट मेट्रोने जोडले जाणार आहेत. त्यामुळे रोजच्या प्रवासात जाणारा वेळ, इंधनाचा खर्च आणि ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.


या प्रकल्पाचे काम नोव्हेंबर २०२१ मध्ये सुरू झाले होते. आतापर्यंत माण ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक दरम्यानच्या १९ किलोमीटर मार्गावर यशस्वी चाचणी पूर्ण झाली आहे. उर्वरित सुमारे ५ किलोमीटरचा टप्पा अंतिम टप्प्यात असून, मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण मार्ग सुरू करण्याचे पीएमआरडीएचे उद्दिष्ट आहे.

या मार्गावर एकूण २३ स्थानके असणार असून मेगापॉलिस सर्कल, इन्फोसिस फेज़ २, विप्रो फेज़ २, वाकड चौक, बालेवाडी स्टेडियम, बाणेर, विद्यापीठ, आरबीआय, शिवाजीनगर, सिव्हिल कोर्ट आदी महत्त्वाच्या भागांचा समावेश आहे

हा देशातील पहिला सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर उभारलेला मेट्रो प्रकल्प असून त्यासाठी सुमारे ८,३१३ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. या मेट्रोमुळे पुण्यातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून प्रदूषणातही घट होईल. रोजच्या प्रवासात अडकून पडणाऱ्या लाखो पुणेकरांसाठी ही मेट्रो एक नवा श्वास ठरणार आहे.

# पुण्यात सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ उद्योजकाची २२ कोटींची फसवणूक

**पुणे, ता. २१ :** पुण्यात सायबर फसवणुकीचे धक्कादायक प्रकार सातत्याने वाढत असतानाच शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष दाखवून एका ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल २२ कोटी ३ लाख २२ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याचप्रकरणात काळ्या पैशांच्या व्यवहारात कारवाईची भीती दाखवून एका महिलेची ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.




मगरपट्टा सिटी परिसरात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाने सायबर पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार ही फसवणूक गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून सुरू झाली. हडपसर औद्योगिक वसाहतीत त्यांचा छोटा कारखाना होता. कोरोना काळात हा कारखाना विकल्यानंतर त्यांना मोठी रक्कम मिळाली होती. हीच बाब सायबर चोरट्यांनी हेरून त्यांना टार्गेट केले.

सायबर चोरट्यांनी मोबाइलवर संपर्क साधत स्वतःला शेअर बाजारातील तज्ज्ञ असल्याचे भासवले. गुंतवणूक केली तर मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखवत त्यांनी सुरुवातीला काही रक्कम गुंतवायला लावली. विश्वास बसावा म्हणून बनावट ॲप आणि वेबसाईटच्या माध्यमातून खात्यात परतावा जमा झाल्याचे खोटे दाखवण्यात आले. प्रत्यक्षात मात्र एकही रुपयाचा नफा मिळालेला नव्हता. हळूहळू मोठ्या परतावाच्या आशेने ज्येष्ठ नागरिकाने वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेळोवेळी तब्बल २२ कोटी ३ लाख २२ हजार रुपये जमा केले. मात्र नंतर पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता खाते बंद, ॲप बंद आणि संपर्क क्रमांक बंद झाल्याने फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

दरम्यान, याच काळात एका महिलेलाही तुमच्या खात्यात काळा पैसा आहे, कारवाई टाळायची असेल तर पैसे भरा, अशी धमकी देत ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे करत असून विविध बँक खात्यांचे व्यवहार तपासले जात आहेत.

# कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेत शिंदें–सेनेला मनसेचा पाठिंबा

## भाजप विरोधी बाकावर बसणार?, खासदार शिंदे यांची माहिती

**कल्याण, ता. २१ :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका २०२६ सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालानंतर कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने आता सत्तास्थापनेसाठी मोठ्या नाट्यमय घडामोडी घडताना दिसत आहेत. अशातच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. मनसेने शिंदेसेनेला पाठिंबा दिल्याची माहिती समोर आल्याने पुन्हा एकदा राजकारणात काहीही घडू शकते याचा प्रयत्य या निमित्ताने पाहायला मिळत आहे.



मनसे आणि शिंदेसेना यांच्यात गुप्त बैठकांचा सिलसिला सुरू होता. या पार्श्वभूमीवर आज सकाळपासून मोठ्या घडामोडींनी वेग घेतला आणि निर्णय अंतिम झाल्याची माहिती समोर आली आहे. शिंदेसेना आणि मनसेच्या या खेळीने इतर राजकीय पक्षांना आश्चर्याचा मोठा धक्का दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज ठाकरेंच्या मनसेला सोबत घेऊन शिंदे सेना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत आपला महापौर बसवण्याची शक्यता आहे. त्यामुळे एक वेगळे राजकीय समीकरण या निमित्ताने बघायला मिळणार आहे.

कल्याण डोंबवली महापालिकेत एकूण १२२ जागा असून, त्यापैकी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ५३ जागा मिळाल्या आहेत. त्यानंतर दुसऱ्या स्थानावर भाजप असून, भाजपला ५० जागा मिळाल्या आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला ११ जागा मिळाल्या आहेत. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ५ जागांवर विजय मिळवला आहे. कालपासून मनसे आणि शिंदे सेनेच्या युतीच्या चर्चा सुरु असल्या तरी त्याबाबत कोणत्याही पक्षाने अधिकृत भाष्य याबाबत केलेले नाही. दरम्यान, शिंदे सेना आणि मनसेचे नगरसेवक ज्यावेळी कोकण विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात पोहोचले तेव्हा याठिकाणी श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के आणि मनसेचे राजू पाटील यांची भेट झाली. त्यांच्या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विकासासाठी जो कोणी बरोबर येईल, त्याला आम्ही सोबत घेऊ, असे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले आहेत.

# दहावी बारावी परीक्षा केंद्रावरील शिक्षकांच्या अदलाबदलीस स्थगिती

## मुख्याध्यापक महामंडळाच्या मागणीला यश

**संतोष पवार**

इंदापूर, ता. २१ : दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या नियोजनाबाबत शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक ठरणारे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या अनेक प्रलंबित मागण्यांना तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे.



या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे दहावी-बारावी परीक्षा केंद्रांवरील केंद्रसंचालक आणि पर्यवेक्षकांची होणारी अदलाबदल रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे परीक्षा काळात निर्माण होणारा प्रशासकीय गोंधळ आणि मनस्ताप कमी होणार आहे. तसेच, परीक्षा पारदर्शकतेसाठी वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शाळांनी सहकार्य करावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा कामकाजासाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात १० ते १५ टक्के वाढ करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून, परीक्षा कालावधीत प्रवासादरम्यान अपघात किंवा दुर्दैवी घटना घडल्यास राज्य शिक्षण मंडळाकडून आर्थिक मदत दिली जाणार आहे. केंद्रसंचालक म्हणून काम करणाऱ्या मुख्याध्यापकांना परीक्षा आणि उत्तरपत्रिका तपासणीच्या कामातून सूट देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. परीक्षा केंद्रावरील खर्च १०० रुपयांवरून ३०० रुपये करण्यात येणार असून, मोठ्या संख्येतील प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी कस्टडीयनपासून शाळेपर्यंत विशेष वाहनांची सोय करण्यात येणार आहे. तसेच प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. शिक्षण संक्रमण पुस्तिका बंद करून ती नाममात्र दरात डिजिटल स्वरूपात शाळा, शिक्षक आणि पालकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन गुणपत्रक आणि प्रमाणपत्रांवरील नाव नोंदणीच्या पद्धतीतही सुधारणा करण्यात येणार आहे.

दरम्यान, या सर्व मागण्यांना मान्यता देण्यात आली असून, त्यासंबंधीचे आदेश विभागीय अध्यक्षांना तातडीने देण्यात येणार असल्याची माहिती राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली. या निर्णयांमुळे परीक्षा व्यवस्था अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि विद्यार्थी-केंद्रित होण्यास मदत होणार असून राज्यभरातील शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.